विक्रीकर आयुक्तांचे कार्यालय,
८ वा मजला, विक्रीकर भवन,
माझगांव , मुंबई ४०० ०१०

# -: व्यापारी परिपत्रक :-

क्र.: विसआ(मुख्या-२)/PSI- ४६ /२०१३/ मुंबई, दि.
परिपत्रक क्र.: ३T दि. २४.०१.२०१४

विषय : महाराष्ट्र औद्योगिक धोरण २०१३ नुसार पुनरुज्जीवनक्षम नसलेल्या तसेच बंद घटकांसाठी विशेष अभय योजना (Special Amnesty Scheme),

संदर्भ : १) शासननिर्णय क्र. एस.आय.सी. २०१३/प्र.क्र.५१/१३/उद्योग-१० मुंबई ३२, दि. २ मे २०१३.
२) शासननिर्णय क्र. एस.आय.सी. २०१३/प्र.क्र.५१/१३/उद्योग-१० मुंबई ३२, दि. १ जुलै, २०१३
३) शासननिर्णय क्र. एस.आय.सी. २०१३/प्र.क्र.५१/१३/उद्योग-१० मुंबई ३२ , दि. १ ऑगस्ट २०१३
४) परिपत्रक उसं./आऊक/विषेश अभय योजना-२०१३-१४/कार्यपध्दती/ २०१३/बी-१८०९४, दि. ०७/१२/२०१३

१. महाराष्ट्र औद्योगिक धोरण २०१३ नुसार पुनरुज्जीवनक्षम नसलेल्या तसेच बंद घटकांना सुलभ निर्गमन पर्याय उपलब्ध करुन देण्याकरीता शासनाने विशेष अभय योजना (Special Amnesty Scheme) उपरोक्त संदर्भाधीन शासन निर्णयानुसार जाहीर केली आहे.

२. <u>योजनेसाठी पात्र घटक</u>
जे उद्योग घटक शासननिर्णय क्र. एस.आय.सी. २०१३/प्र.क्र.५१/१३/उद्योग-१० मुंबई ३२, दि. १ ऑगस्ट २०१३ चे निकष पूर्ण करतील असे उद्योग घटक सदर अभय योजनेकरीता पात्र समजण्यात येईल.

सदर उद्योग घटकाने या विशेष अभययोजनेखाली पात्र असल्याचे प्रमाणपत्र उद्योग विभागाकडून सादर करणे बंधनकारक राहील.

३. <u>अभययोजनेचा कालावधी</u>
ही योजना दि. ३१.०३.२०१४ पर्यंत सुरू राहील.

४. <u>योजनेव्दारे देण्यात आलेले फायदे</u>
या योजनेअंतर्गत पात्र ठरणा-या घटकांनी राज्य शासनाची विक्रीकराच्या प्रलंबित थकबाकी पैकी मुद्दलाची (Principal Amount) पुर्ण रक्कम ,

www.taxguru.in

एकरकमी भरल्यास व्याज व दंडनीय रक्कम माफ केले जाईल. सदर उद्योग घटकाने थकबाकीच्या मुद्दलाच्या रकमेचा अंशतः भरणा केल्यास संबंधित उद्योग घटकास कोणतेही लाभ मिळणार नाहीत.

५. **अर्ज :**

पात्र उद्योग घटकाने या योजनेअंतर्गत विक्रीकर विभागाद्वारे अंमलबजावणी करण्यात येणा-या सर्व कायद्यांअंतर्गत वर्षनिहाय व कायदानिहाय अर्ज प्रलंबित थकबाकीकरीता सोबत दिलेल्या नमुन्यामध्ये करणे बंधनकारक राहील.सदरचा अर्ज हा पात्र उद्योग घटकाचे मुख्य व्यवसायाचे ठिकाण ज्या ठिकाणी स्थित आहे, अशा ठिकाणच्या विक्रीकर सहआयुक्त (मूल्यवर्धित कर प्रशासन) (**VAT ADM**) यांच्याकडे करावा. मुंबई विभागासाठी सदर अर्ज विक्रीकर सहआयुक्त ( वसुली ), विक्रीकर भवन, माझगांव, मुंबई येथे करावा.

६. **अर्जासोबत दाखल करावयाची कागदपत्रे**

पात्र उद्योग घटकाने अर्जासोबत खाली दिलेल्या कागदपत्रांची पूर्तता करणे आवश्यक राहील.

(१) सदर उद्योग घटक शासन निर्णय क्रमांक एस. आय. सी. २०१३/प्र. क्र. ५१/१३/उद्योग-१०/या दि. ०२ मे २०१३, शासननिर्णय क्र. एस.आय.सी. २०१३/प्र.क्र.५१/१३/उद्योग-१० मुंबई ३२ दि. १ जुलै, २०१३ व शासननिर्णय क्र. एस.आय.सी. २०१३/प्र.क्र.५१/१३/उद्योग-१० मुंबई ३२ दि. १ ऑगस्ट २०१३ रोजी निर्गमित करण्यात आलेल्या शासन निर्णयानुसार जाहीर करण्यात आलेल्या विशेष अभय योजनेचा लाभ घेण्याकरीता पात्र असल्याचे अभिकरण संस्थेचे (**Implementing Agency**) प्रमाणपत्र.

(२) सदर उद्योग घटकाने, विक्रीकर थकबाकीसंदर्भात मुद्दलाची रक्कम एकरकमी भरल्याबाबतचा पुरावा (चलनांच्या प्रती).

(३) सदर उद्योग घटकाने प्रलंबित थकबाकीकरीता कुठच्याही स्तरावर अपिल दाखल केले असल्यास सदर अपिल माघारी घेण्यात आले आहे, हयाबाबतचा पुरावा.

(४) थकबाकीबाबतचे प्रतिज्ञापत्र हस्तांतरण करणाऱ्या व्यापाऱ्याने दाखल करावे (**Transferor**)

(५) हस्तांतरण केलेल्या व्यापाऱ्याच्या अनिर्धारीत कालावधीसाठी भविष्यात येणारी विक्रीकर थकबाकी (करदेयता + व्याज व शास्तीसहीत) स्विकारीत असल्याचे हस्तांतरीत(**Transferee**) व्यापाऱ्याचे प्रतिज्ञापत्र.

७ **अभय योजनेखाली रक्कम भरावयाची शेवटची तारीख :**

उपरोक्त अभय योजनेसाठी संबंधित पात्र घटकाने सदर योजना जाहीर करण्यापूर्वी , तसेच दि.३१.०३.२०१४ नंतर केलेल्या भरण्याचा विचार या विशेष अभय योजनेकरीता केला जाणार नाही.

www.taxguru.in

८ **ना देय प्रमाणपत्र**

विशेष अभय योजना - २०१३ अंतर्गत लाभार्थी घटकांना ना देय प्रमाणपत्र उद्योग विभागाच्या दि. ०७/०१२/२०१३ च्या परिपत्रकातील खालील तरतूदीच्या अधीन राहून देण्यात यावे. "बंद घटकाच्या व्यवस्थापनाने एकरकमी मुद्दलाची परतफेड केल्यानंतर आणि अंमजबजावणी अधिकाऱ्यांनी बंद उद्योगाची मालमत्ता स्विकारणाऱ्या नवीन व्यवस्थापनाने तीन वर्षाच्या कालावधीमध्ये उद्योग सुरु केल्याचे शासकीय विभाग/कार्यालय/उपक्रम/यंत्रणायांना कळविल्याशिवाय त्यांनी बंद घटकाच्या व्यवस्थापनास किंवा मालमत्ता/ व्यवस्थापन स्वीकारणाऱ्या व्यवस्थापनास "ना देय प्रमाणपत्र " अदा करु नये."

(डॉ. नितीन करीर)
विक्रीकर आयुक्त
महाराष्ट्र राज्य

दिनांक: 28/7/14
ठिकाण: मुंबई

क्र.: विसआ(मुख्या-२)/ PSI- ४६ /२०१३/ मुंबई, दि.
परिपत्रक क्र.: 3T दि. 28-07-2014

१. प्रत सादर :-

१) महाराष्ट्र राज्यातील सर्व अपर विक्रीकर आयुक्त.
२) महाराष्ट्र राज्यातील सर्व विक्रीकर सहआयुक्त.
३) विक्रीकर सहआयुक्त (महाविकास) यांना विक्रीकर विभागाच्या संकेतस्थळावर सदर परिपत्रक अपलोड करण्यासाठी विनंतीपूर्वक.
४) महाराष्ट्र राज्यातील सर्व विक्रीकर उपआयुक्त.
५) महाराष्ट्र राज्यातील सर्व सहाय्यक विक्रीकर आयुक्त.
६) महाराष्ट्र राज्यातील सर्व विक्रीकर अधिकारी.

२. प्रत माहितीकरीता रवाना:-

१) उपसचिव, वित्त विभाग, मंत्रालय,मुंबई.
२) अवरसचिव, वित्त विभाग, मंत्रालय,मुंबई.
३) लेखा अधिकारी, विक्रीकर महसूल लेखा परिक्षण, मुंबई आणि नागपूर.
४) विक्रीकर आयुक्त, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांच्या कार्यालयातील सर्व कार्यासन व कार्यासन अधिकारी यांना प्रत.

विक्रीकर सह आयुक्त ( मुख्या-२)
महाराष्ट्र राज्य

दिनांक: 28/7/14
ठिकाण: मुंबई

www.taxguru.in